नाशिक
दि.९/५/२०१९

# प्रेसनोट

## आलोसे गणेश अशोक नागरे,पोलीस शिपाई ब.नं.४४२, नेमणुक येवला तालुका पोलीस स्टेशन जि.नाशिक ग्रामीण यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केले बाबत.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | येवला शहर पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण येथे गुरनं. ४४/२०१९ |
| **कलम** | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८(संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपींचे नांव व कार्यालय** | गणेश अशोक नागरे,पोलीस शिपाई ब.नं.४४२, नेमणुक येवला तालुका पोलीस स्टेशन जि.नाशिक ग्रामीण |
| **मागणी कलेली लाचेची रक्कम** | ८,०००/—रुपये लाचेची मागणी |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ००/—रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचे नातेवाईकाचे वाहनाचा अपघात होवून त्यात नातेवाईकाचा मृत्यू झाला आहे.त्याबाबत येवला तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांचे नातेवाईकांचे अपघातग्रस्त वाहन सोडण्यासाठी व तक्रारदार यांना ॲक्सीडेंट क्लेमसाठी आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी आलोसे गणेश अशोक नागरे, पोलीस शिपाई ब.नं.४४२, नेमणुक येवला तालुका पोलीस स्टेशन जि.नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी दि.२७/०२/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक नाशिक विभाग कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.२७/०२/२०१९ रोजी येवला तालुका पोलीस स्टेशन येथे ला.प्र.वि.नाशिक पथकाचे सापळापुर्व पडताळणी दरम्यान पंचासमक्ष आलोसे गणेश अशोक नागरे,पोलीस शिपाई ब.नं.४४२, नेमणुक येवला तालुका पोलीस स्टेशन जि.नाशिक ग्रामीण यांनी तक्रारदार यांचेकडून १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ८,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द आज दिनांक ९/५/२०१९ रोजी येवला शहर पोलीस स्टेशन, जि.नाशिक ग्रामीण येथे गुरनं. ४४/२०१९ अन्वये भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

लाचलुपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन : acbmaharastra.net

टोल फ्री क्र. : १०६४

दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०

व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

( प्रभाकर घाडगे )
पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो नाशिक परिक्षेत्र, नाशिक
सत्यमेव जयते